## वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

## -: सुचना :-

लघुलेखक निम्नश्रेणी पदासाठी जे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत. त्यांनी मुलाखतीच्या वेळेस खालील प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती आणि त्यांचे मूळ प्रमाणपत्रे जिल्हा न्यायालयाच्या प्रबंधकाकडे सादर करावयाचे आहे.

१. जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा/जन्माचा/एस. एस. सी. दाखला)

२. अर्हता परिक्षा/पदवी परिक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला.

३. अर्हता परिक्षेत/पदवी परिक्षेत मिळालेल्या गुणांचे विवरणपत्र.

४. दोन सन्माननीय व्यक्ती, ज्यांची नावे मुळ अर्जात नमुद केलेली आहेत, त्यांनी दिलेला, त्याचे/तिचे चारित्र्य चांगले असल्याबद्दलचा चारित्र्याचा दाखला.

५. अर्हतेच्या रकान्यात नमूद केल्याप्रमाणे, संगणक प्रचालनाचे विहित ज्ञान असल्याबाबतचा विद्यापीठ / संस्थेने दिलेला दाखला.

६. इंग्रजी आणि मराठी लघुलेखनातील व टंकलेखनातील आवश्यक वेग असल्याबाबतचा शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र शासन किंवा शासकीय मंडळ किंवा आय.टी.आय. यांनी दिलेला दाखला.

७. संबंधीत जिल्हा सरकारी रूग्णालयातील जिल्हा शल्य चिकीत्सक/ वैद्यकीय अधीक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागू असल्यास.

८. शासन विहीत करेल त्या अधिका-याने दिलेला जातीचा दाखला, जेथे लागू असेल तेथे.

९. छोटया लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र (नमुना 'अ' (मुळ)) जे जाहिरातीच्या शेवटी उपलब्ध आहे.

१०. विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, जर उमेदवार हयापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर.

आदेशानुसार